Page No.:
Date:

# मुग्ध कळी

मुग्ध कळीच्या कानाशी बिलगुन वारा हळूच म्हणाला ।
बावरतेस, अन् लाजतेस अशी, काय झालेय काय तुला ॥
कळी मनात म्हणते, काय सांगू या अवखळ वाऱ्याला ।
काय झालेय मला, कळेना ते माझेच मला ॥
मनात दाटले काहूर, अन् काळीज धडधडते ।
असच काहीतरी मनातून बाहेर येऊ बघते ॥
भुंग्याची भुणभुण आज हवी हवीशी वाटते ।
सखी सोबतीणींची दंगामस्ती नवी नवीच वाटते ॥
मनात वाटते, फांदीवर बसून खूप झोके घ्यावेत ।
झुलतांना, डोलतांना गोड गाणे गुणगुणावे ॥
मनात माझ्या येते आकाशात उंच उंच उडावे जावे।
ढगावर स्वार होऊन चंद्राला बिलगुन बसावे ॥
चांदणं सारं प्यावे अन तृप्त तृप्त व्हावे ।
तेज पांघरुन अंगावर, रोमरोमी रोमांचित व्हावे ॥
उन्याच्या आरशात स्वतःला पुन्हा पुन्हा बघावे ।
सौंदर्याच्या साक्षात्काराने चिंब चिंब भिजावे ॥
मनातला हा मधाळ मोहर, कुणाला दाखवू कशी? ।
लज्जेचा, शालीनतेचा संस्कार डावलू कशी?॥
कळीचे मन वाऱ्याने, मनोमन जाणलं ।
तलम रेशमी फुंकर घालून तिला हळूच झुलवलं ॥
फुललेले रुप बघुन कळीचा चेहरा खुलला ।
वेडीचा वेडा भाव वेड्यानेच ओळखला ॥
कृतज्ञ भावाने तिने मग वाऱ्याकडे पाहिले ।
सारा सुगंध देऊन, ऋण त्याचे फेडिले ॥
कळीचे बदललेलं रुप निरागस यौवनेनं पाहिलं ।
लाजली, बावरली.. सारं काही तिचं तिलाच कळलं ॥
तिचं तिलाचं कळलं.

—o—

शोभा पांडे
गुरुगणेश नगर कोथरुड
पुणे